जलसंपदा विभागातील शाखा अभियंता (स्थापत्य)
या पदाचे सेवा प्रवेश नियम.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमएससी १०१५/प्र.क्र.६२/१५/आ (संनि),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ एप्रिल, २०१८

शासन निर्णय :-

जलसंपदा विभागातील शाखा अभियंता (स्थापत्य) या पदाचे सेवा प्रवेश नियम संविधानाच्या अनुच्छेद ३०९ अंतर्गत सोबतच्या अधिसूचनेत (इंग्रजी व मराठी) दर्शविल्याप्रमाणे शासन विहित करीत आहे.

उपरोक्त अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in हया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०४२५१५१०१९८२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Govind
Appasaheb
Lokhande

Digitally signed by Govind Appasaheb Lokhande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra,
ou=Water Resources Department,
postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=f497facd37c9db39517e49b131f934002b
b9765b01b8f0ea3dca43732f3ecd29,
serialNumber=ce89373fc7a728d2cdfa1a26c08e1e
3f7e3f4f232c1bd146794d3cc3034d5701,
cn=Govind Appasaheb Lokhande
Date: 2018.05.07 11:39:22 +05'30'

(गो.आ.लोखंडे)
शासनाचे सह सचिव

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
४. प्रधान सचिव (जसंनि व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
५. सचिव (जसंव्य व लाक्षेवि) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव (प्रकल्प समन्वय) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई..
७. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
८. विरोधी पक्ष नेता, विधानसभा यांचे खाजगी सचिव
९. मा. मंत्री (जलसंपदा) / मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव
१०. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संकल्पन प्रशिक्षण व जलविज्ञान संशोधन व सुरक्षितता मेरी, नाशिक.
११. महासंचालक, जल व भूमि व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद.
१२. जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व महामंडळांचे कार्यकारी संचालक
१३. सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई.

१४. जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता.
१५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, मुंबई (पत्राने)
१६. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १२), मंत्रालय, मुंबई
१७. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. जलसंपदा विभागातील सर्व आस्थापना कार्यासने
२०. आ (संनि) कार्यासन संग्रहार्थ.

WATER RESOURCES DEPARTMENT,
MANTRALAYA, MUMBAI 400 032.
Dated the 25th April 2018.

NOTIFICATION

CONSTITUTION OF INDIA

No.-MSC.1015/C.R.62/15/E(CR) :- In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Sectional Engineer (Civil), Group B, in the Maharashtra Service of Engineers (Recruitment) Rules , 1997 , namely :-

1. These rules may be called the Sectional Engineers (Civil), Group B, in the Maharashtra Service of Engineers (Recruitment) (Amendment) Rules, 2018.
2. In the Sectional Engineer (Civil), Group B, in the Maharashtra Service of Engineers (Recruitment) Rules, 1997 (hereinafter referred to as "the Principal Rules"), in the preamble for the words "Irrigation Department" the words "Water Resources Department" shall be substituted.
3. In rule 2 of the principal Rules, in clause (a) for the words "Irrigation Department" the words "Water Resources Department " shall be substituted.
4. For rule 3 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely :-

"3 Appointment to the post of Sectional Engineer (civil), Group-B(Gazetted) in the Maharashtra Services of Engineers shall be made on the basis of seniority subject to fitness, from amongst the persons holding the post of Junior Engineer who,-

(a) possess a degree of Statutory University or of recognized institute, in Civil Engineering or any other qualification declared by the Government to be equivalent thereto; and have joined in this cadre willingly, and have put in not less than five years regular service as a Junior Engineer on regular establishment in the Department; or

(b) Possess a three years Diploma of Statutory University or awarded by the State Technical Education Board in Civil Engineering or any other qualification declared by the Government to be equivalent thereto; and have put not less than five years regular service as Junior Engineer on regular establishment in the Department; or

(c) possess an Upper Subordinate Certificate awarded by the Osmania University, or any other qualification declared by the Government to be equivalent thereto; and have put in not less than seven years regular service as Junior Engineer on regular establishment in the Department; or

(d) does not possess any of the qualifications mentioned in clauses (a) (b) and (c) above but have put in not less than ten years regular service as a Junior Engineer on regular establishment in the Department.

Provided that, Junior Engineer possessing the qualifications and experience in clauses (a), (b), (c) and (d), above should have passed the Professional Examination specified in Apprndix -1 of the Maharashtra Public Works Manual for the post of Junior Engineer, before appointing to the post of Sectional Engineer (Civil) , Grade B."

5. For rule 4 of the Principal Rules, the following rule shall be substituted namely:-

"4. A person should have passed the Examinations in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted, from passing those examination, before appointing to the post of Sectional Engineer (Civil), Group B"

6. After Rule 5 of the Principal Rules, the following shall be added , namely:-

"6. A person should possess a Certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information Technology of the Government of Maharashtra from time to time, before appointing to the post of Sectional Engineer (Civil), Group B."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Govind Appasaheb Lokhande

Digitally signed by Govind Appasaheb Lokhande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f497facd37c9db39517e49b131f934002bb9765b01b8f0ea3dca43732f3ecd29, serialNumber=ce89373fc7a728d2cdfa1a26c08e1e3f7e3f4f232c1bd146794d3cc3034d5701, cn=Govind Appasaheb Lokhande
Date: 2018.05.07 11:40:25 +05'30'

Joint Secretary to Government.

जलसंपदा विभाग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक २५ एप्रिल २०१८.

<u>अधिसूचना</u>

भारताचे संविधान

<u>**क्रमांक: एमएससी १०१५/प्र.क्र.६२/१५/आ(संनि)**</u> **:-** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे , महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, गट-ब मधील शाखा अभियंता (स्थापत्य) (सेवाप्रवेश) नियम, १९९७ या नियमांमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत :-

१. या नियमांना महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट-ब मधील शाखा अभियंता (स्थापत्य) (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१८ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट-ब मधील शाखा अभियंता (स्थापत्य), (सेवाप्रवेश) नियम, १९९७ मध्ये (यात यापुढे ज्याचा निर्देश “मुख्य नियम” असा करण्यात आला आहे.) प्रस्तावनेमध्ये जेथे “पाटबंधारे विभाग” असे शब्द आलेले आहेत, तेथे “जलसंपदा विभाग” असे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

३. मुख्य नियमांतील नियम २ (अ) मध्ये जेथे “पाटबंधारे विभाग” असे शब्द आलेले आहेत तेथे “जलसंपदा विभाग” असे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

४. मुख्य नियमातील नियम ३ वगळून त्याऐवजी पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :-

“३. महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट-ब मधील शाखा अभियंता (स्थापत्य), या पदावरील नियुक्ती खालील पात्रता धारण करणा-या कनिष्ठ अभियंत्यांमधून ज्येष्ठता अधीन पात्रतेच्या तत्वावर करण्यात येईल :-

(अ) ज्यांनी सांविधिक विद्यापीठाची किंवा मान्यताप्राप्त संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी अथवा शासनाने तिच्याशी समकक्ष म्हणून मान्यता दिलेली अर्हता धारण केल्यानंतर, ज्यांची कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गात स्वेच्छेनुसार नियुक्ती करण्यात आली असेल अशा, विभागात नियमित आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता पदावर ५ वर्षाची सेवा पूर्ण केली आहे; किंवा,

(ब) सांविधिक विद्यापीठाची / राज्य तंत्र शिक्षण मंडळाची स्थापत्य अभियांत्रिकी मधील ३ वर्षांची पदविका अथवा शासनाने तिच्याशी समकक्ष म्हणून मान्यता दिलेली अर्हताधारण केली आहे, अशा विभागात नियमित आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता पदावर किमान ५ वर्षाची नियमित सेवा पूर्ण केली आहे; किंवा,

(क) ज्यांनी उस्मानिया विद्यापीठाचे अप्पर सबॉर्डिनेट प्रमाणपत्र किंवा शासनाने त्यांच्याशी समकक्ष म्हणून जाहिर केलेली अर्हता धारण केल्यानंतर विभागात नियमित आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता पदावर किमान ७ वर्षे नियमित सेवा केली आहे; किंवा,

(ड) ज्यांनी (अ), (ब) आणि (क) मधील अर्हता धारण केलेली नाही, परंतु, विभागामध्ये नियमित आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता पदावर १० वर्षे नियमित सेवा केली आहे.

परंतु असे की, उपरोक्त नमूद (अ), (ब), (क) व (ड) मधील अर्हता व अनुभव धारण करणा-या कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर नियुक्ती देण्यापूर्वी, कनिष्ठ अभियंता पदासाठी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेमधील परिशिष्ट-१ मध्ये विहित केलेली व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य असेल."

५. मुख्य नियमांच्या नियम ४ ऐवजी पुढील नियम अंतर्भूत करण्यात येईल :-

"४. शाखा अभियंता (स्थापत्य) गट "ब" या पदावर नियुक्ती देण्यापूर्वी त्या व्यक्तीस नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा, जर ती व्यक्ती आधीच या परीक्षा उत्तीर्ण नसेल तर अथवा अशा परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसेल तर, उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल."

६. मुख्य नियमांच्या नियम ५ नंतर पुढील नियम अंतर्भूत करण्यात येईल :-

"६. शाखा अभियंता (स्थापत्य) गट "ब" या पदावर नियुक्ती देण्यापूर्वी त्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवळी विहित केलेले संगणक हाताळणी / वापराबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Govind Appasaheb Lokhande

Digitally signed by Govind Appasaheb Lokhande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f497facd37c9db39517e49b131f9340 02bb9765b01b8f0ea3dca43732f3ecd29, serialNumber=ce89373fc7a728d2cdfa1a26c08 e1e3f7e3f4f232c1bd146794d3cc3034d5701, cn=Govind Appasaheb Lokhande
Date: 2018.05.07 11:41:43 +05'30'

शासनाचे सह सचिव.